# विविध क्लब

## बिजनेस क्लब

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष व्यवसायाचे कौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने बिजनेस क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे. महाविद्यालयामध्ये उद्योजकीय आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या समजून सांगण्याच्या उद्देशाने या क्लब मार्फत काम केले जाते यशस्वी उद्योजकांची भेट घडवून आणणं त्याचबरोबर त्यांना आवश्यक असणारे उद्योजकीय बाबींचे प्रशिक्षण देणं हे या क्लबचं महत्त्वाचं उद्दिष्ट आहे. या क्लब अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या कंपनीमध्ये कंपनीचे सीईओ मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह बिझनेस डेव्हलपर टेक्निकल हेड यासारख्या ऑफिशिअली पदनामांनी मुलांना जबाबदारी दिली जाते आणि या पदांवर कार्य केल्याचं अनुभव प्रमाणपत्र देखील दिले जातं. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी मदत करतो, विद्यार्थ्यांच्या व्यवसायिक विकासासाठी हा क्लब अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

## EQ क्लब

हा करिअर कट्टा अंतर्गत राबविण्यात येत असलेला एक अभिनव उपक्रम आहे, जो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भावनिक बुद्धिमत्तेचे महत्त्व अधोरेखित करतो. जगभरातील १०० महाविद्यालयांतील ११०० विद्यार्थ्यांसाठी वर्षभर चालणारा हा 'इमोशनल इंटेलिजन्स' उपक्रम आहे. या अंतर्गत तज्ज्ञ मार्गदर्शिका मा. मिथिला दळवी आणि "6 Seconds Organisation (USA)' यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे जागतिक दर्जाचे 'EQ Assessment' पूर्ण केले जाते, ज्यामुळे त्यांना स्वतःची भावनिक क्षमता ओळखता येते आणि ती अधिक प्रभावीपणे वापरता येते.

### विद्यार्थ्यांसाठी भावनिक बुद्धिमत्तेची आवश्यकता

**– स्व-ओळख (Self-awareness):** विद्यार्थ्यांना त्यांच्या भावना, ताकद आणि कमकुवत बाजू समजून घेणे आवश्यक असते. EQ त्यांना स्वतःकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याची क्षमता देते.

**– तणाव व्यवस्थापन (Stress management):** शैक्षणिक दबाव, स्पर्धा आणि करिअरची अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव वाढतो. भावनिक बुद्धिमत्ता त्यांना तणावावर मात करण्याचे कौशल्य शिकवते.

**– संबंध कौशल्ये (Relationshpi skills):** महाविद्यालयीन जीवनात मित्र, शिक्षक आणि सहकारी यांच्याशी सुसंवाद साधणे महत्त्वाचे असते. EQ विद्यार्थ्यांना सहानुभूती, संवादकौशल्य आणि सहकार्याची वृत्ती विकसित करण्यात मदत करते.

**– निर्णय क्षमता (Decision-making):** भावनिक बुद्धिमत्ता विद्यार्थ्यांना भावनांच्या प्रभावाखाली न येता तर्कसंगत आणि संतुलित निर्णय घेण्यास सक्षम करते.

**– करिअर यश (Career success):** आजच्या जागतिक रोजगार बाजारात केवळ तांत्रिक कौशल्ये पुरेशी नसतात; भावनिक बुद्धिमत्ता ही नेतृत्व, टीमवर्क आणि नवोन्मेषासाठी अत्यावश्यक ठरते.
EQ क्लब विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक यश नव्हे तर; जीवनातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी सज्ज करतो. भावनिक बुद्धिमत्ता ही त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रवासातील एक महत्त्वाची गुरुकिल्ली ठरते.

## फायनान्स क्लब

करिअर कट्टाचा फायनान्स क्लब हा विद्यार्थ्यांना आर्थिक जगाचे सखोल ज्ञान देणारा आणि प्रत्यक्ष अनुभव मिळवून देणारा एक उपक्रम आहे. या क्लबमध्ये केवळ बचत आणि गुंतवणुकीचे मूलभूत तत्त्व शिकवले जात नाही, तर आधुनिक अर्थव्यवस्थेतील बदल, शेअर बाजारातील चढ-उतार, म्युच्युअल फंड, विमा, कर प्रणाली यांसारख्या विषयांवरही सखोल चर्चा केली जाते.

### फायनान्स क्लबच्या उपक्रमांमध्ये –

- तज्ज्ञांकडून थेट मार्गदर्शन मिळते.
- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आर्थिक निर्णय घेण्याचा सराव व्हावा बचतीचे महत्व कळावे म्हणून काही टास्क दिले जातात.
- विविध दृष्टिकोनातून आर्थिक विषयांचा विचार करण्याची संधी मिळते.
- फायनान्स क्षेत्रातील करिअर संधी, कौशल्ये आणि आवश्यक तयारी याबद्दल विस्तृत माहिती दिली जाते.

हा क्लब विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक ज्ञान देत नाही, तर आर्थिक शिस्त, जबाबदारी आणि आत्मविश्वास विकसित करण्यास मदत करतो. त्यामुळे फायनान्स क्लब हा करिअर कट्टा चा एक महत्त्वाचा स्तंभ ठरतो, जो विद्यार्थ्यांना भविष्यातील आर्थिक आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यास तयार करतो आहे.

सुमारे वर्षभरापूर्वीपासून युवकांसाठी करिअर कट्टा या मासिकातून, Financial Literacy च्या Expert Guide माननीय डिंपल मित्तल मॅडम या सातत्याने लेखाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांशी संवाद साधत आहेत त्यांना या विषयावर मार्गदर्शन करीत आहेत.

★ ★ ★